# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/२४८
दिनांक : 15 MAR 2017

प्रति,
१.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर

२.विभागीय प्राधिकारी , एमएचटी सीईटी २०१७

३.सर्व जिल्हा संपर्क अधिकारी, एमएचटी सीईटी २०१७

विषय : अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी घेण्यात येणा-या एमएचटी-सीईटी २०१७ या प्रवेश परीक्षेच्या कामासाठी स्वतंत्र बँक अकाऊंट उघडण्याबाबत..

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक क्रमांक:
१) २अ/एडीएम/२०१७/१०८,दि.१.२.२०१७
२) २अ/एडीएम/२०१७/१५९, दि.१०.२.२०१७

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष पदवी प्रवेशासाठी घेण्यात येणा-या एमएचटी-सीईटी २०१७ या प्रवेश परीक्षेसाठी मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांनी संचालकांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे . या परीक्षेसाठी संदर्भाधीन दिनांक १.२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये विभागीय प्राधिकारी ,जिल्हा संपर्क अधिकारी आणि सहाय्यक जिल्हा संपर्क अधिकारी यांच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत. संदर्भाधीन दिनांक १०.२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये एमएचटी-सीईटी २०१७ या प्रवेश परीक्षेसंदर्भात सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. त्यातील मुद्दा क्रमांक ४ मध्ये जिल्हा संपर्क अधिका-यांचे नावे बँक अकाऊंट असणे आवश्यक असल्याने ते नसल्यास आवश्यकतेनुसार नवीन खात्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे आपल्या कार्यालयातून निर्गमित करण्यात यावीत असे कळविण्यात आलेले होते. तथापि दिनांक २८.२.२०१७ रोजी सीईटीसंदर्भात झालेल्या बैठकीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे विचारात घेऊन विभागीय प्राधिकारी आणि जिल्हा संपर्क अधिकारी यांना सीईटी परीक्षेसाठी दयावयाचे अग्रीम , करावयाचे खर्च यासाठी स्वतंत्र बँक अकाऊंट खाते उघडण्याबाबत कळविण्यात येत आहे. याबाबत खालील बाबींचे अवलोकन करण्यात यावे.

१. एमएचटी-सीईटी २०१७ या प्रवेश परीक्षेसाठी विभागीय प्राधिकारी आणि जिल्हा संपर्क अधिकारी यांनी राष्ट्रीयकृत (core banking facility असलेल्या ) बँकेत स्वतंत्र saving/current खाते

उघडावे. विभागीय प्राधिकारी यांनी स्वतंत्र खाते उघडताना "विभागीय प्राधिकारी ......(ते ज्या ठिकाणी कार्यरत आहेत त्या मुख्यालयाच्या जिल्हयाचे नाव ) आणि जिल्हा संपर्क अधिकारी यांनी "जिल्हा संपर्क अधिकारी ........ (संबंधित जिल्हयाचे नाव) " या नावाने बँकेत खाते उघडावे.

2. संबंधित अधिका-यांनी बँकेत उपरोक्त प्रमाणे खाते उघडण्यासाठी आवश्यक असणारी PAN Card, Aadhar Card ,Adress Proof इ.कागदपत्रे वैयक्तिकरित्या सादर करावीत.
3. सदरच्या नावाने खाते उघडण्यासाठी प्रमाणपत्र आवश्यक असल्यास संचालनालयाच्या विभागीय कार्यालयाकडून प्राप्त करून घ्यावे. विभागीय कार्यालयांनी असे प्रमाणपत्र देताना संचालनालयाच्या आदेशांचा व पत्राचा संदर्भ नमूद करून असे प्रमाणपत्र निर्गमित करावे.
4. विभागीय प्राधिकारी आणि जिल्हा संपर्क अधिकारी यांनी राष्ट्रीयकृत बँकेत उपरोक्त प्रमाणे उघडण्यात आलेल्या खात्याचा तपशिल (उदा.बँकेचे नाव,शाखा, अकाऊंट नंबर,आयएफसी कोड, इ.) संबंधित विभागीय कार्यालयांना सादर करावा , जेणेकरून विभागीय कार्यालयांकडून आवश्यक तेवढे अग्रीम सदर खात्यात वर्ग करण्यात येईल.

वर निर्देशित केल्याप्रमाणे सर्व विभागीय प्राधिकारी आणि जिल्हा संपर्क अधिकारी यांनी बँकेत स्वतंत्र खाते उघडण्याची कार्यवाही करावी. विभागाच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा संपर्क अधिकारी आणि विभागीय प्राधिकारी यांच्या बँक अकाऊंटसंदर्भातील एकत्रित माहिती सर्व विभागीय कार्यालयांनी संचालनालयास सादर करावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तथा नोडल अधिकारी,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/एमटी-सीईटी/२०१७/661
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 17 MAR 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-

१) रोखपाल, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्राचे अवलोकन करुन आवश्यक कार्यवाही करावी.
२) प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती व शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ / खामगांव / वाशिम / मुर्तिजापूर यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील नियुक्त जिल्हा संपर्क अधिकारी यांना सदर पत्र निर्दशनास आणुन देवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळवावे.
३) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्याकरीता.